# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in Distress Situation**

**Police Station** :- **Washim Rural**

**Date of Good Work done** :- **03/12/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथील ठाणेदार सपोनि झळके व त्यांचे पथकाने पोलीस स्टेशन येथे दाखल बलात्काराच्या गुन्ह्यातील फरार झालेल्या आरोपीचा तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन अवघ्या 48 तासात अकोला येथून ताब्यात घेऊन गुन्ह्यातील दोन्ही आरोपीस शिताफीने अटक केली आहे.

## बलात्कार प्रकरणातील 'तो' आरोपी गजाआड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम ■** अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात वाशिम ग्रामीण पोलिसांना यश आले आहे.

या संदर्भात मिळालेली माहिती अशी की, २७ नोव्हेंबर रोजी पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथे फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला हजर होवून जबानी रिपोर्ट दिला होता की,त्याची अल्पवयीन पिडीत मुलगी हिने २६ नोव्हेंबर रोजी रात्री दरम्यान फिर्यादी हिला सांगितले कि, गावात राहणारे इसम नामे अनिल केशव इढोळे व आकाश मनोहर इढोळे रा.आडोळी, यानी ३१ ऑक्टोंबरचे अंदाजे १०. ३० वाजेदरम्यान घरासमोर उभी असताना या दोघानी जबरदस्तीने तोंड दाबून मो.सायकलवर बसवून अनिल इढोळे याचे शेतात नेले व जिवाने मारण्याची धमकी देवून तिच्यावर जबरी संभोग केला.तसेच तिला मो.सायकलवर आणून सोडत असताना आकाश इढोळे याने वाईट उद्देशाने तिची छेडछाड केली. अशा जबानी रिपोर्ट वरून वाशिम ग्रामीण पो.स्टे.येथे अप.क्रं.३८८/२१ कलम ३७६ (३), ३५४, ३६३, ३५४(ड), ३२३,५०६,३४ भादवि सह कलम ४,६ बा.लै.अप.सं. अधि.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधिक्षक बच्चन सिंह सो यांचे मार्गदर्शनाखाली सदर गंभीर गुन्हयातील मुख्य आरोपी नामे अनिल केशव इढोळे व सह आरोपी आकाश मनोहर इढोळे याचा शोध घेणे कामी तपास पथक नेमण्यात आले.तसेच आरोपीताचे मोबाईल क्रमांक मिळवून तांत्रिक मदत घेवून त्याचे सी.डी.आर. ।एस.डी.आर व टॉवर लोकेशन काढण्यात आले.त्याप्रमाणे आरोपीचा शोध घेतला असता २९ नोव्हेंबर रोजी यातील मुख्य आरोपी हा अकोला येथे असल्याची माहीती मिळाली त्यावरून तपास पथक तात्काळ अकोला येथे रवाना झाले.व अकोला येथून मुख्य आरोपी नामे अनिल केशव इढोळे याला शिताफिने ताब्यात घेण्यात आले. अवघ्या ४८ तासात यातील मुख्य आरोपीचा शोध घेवून त्यास अटक करण्यात आली. सदर कारवाई पोलीस अधिक्षक बच्चन सिंह , अपर पोलीस अधिकक्ष भामरे उपोअ यशवंत केडगे सो याचे मार्गदर्शनात विनोद झळके ठाणेदार वाशिम ग्रामीण,सपोनि महेश मच्छले, रमेश आडे, अशिष पाठक यांनी सहभाग नोंदविला.पुढील तपास सपोनि महेश मच्छले करीत आहे.(जि.प्र.)